MAHBIL03429/13/1/2000-TC खाजगी वितरणासाठी वर्ष: नववे । अंक: पाचवा । सप्टेंबर, २००९

# CIDCO Nirmiti

A NEWSLETTER



03 ६२व्या स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहात साजरा


04 CIDCO's participation in MEDC Seminar


06 Impact of 12.5% Scheme on Socio Demographic & Economic Profile of PAPs under the Navi Mumbai Project


09 वाशी रेल्वे स्थानक अधिक कार्यक्षम व्यवस्थापनाकरिता व्हीआरएससीसीएलकडे सुपूर्द


## ग्रामविकास भवनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जाईल: ग्रामविकास व पर्यटनमंत्री श्री. मोहिते पाटील

'ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य पंचायत राज व्यवस्थेतून होत आहे. ग्रामविकास कार्याला वेग मिळावा ह्या हेतूने ग्रामविकास भवनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जाईल', अशी ग्वाही राज्याचे ग्राम विकास व पर्यटन मंत्री **श्री. विजयसिंह मोहिते पाटील** यांनी खारघर येथील ग्रामविकास भवनाच्या विकासकामाच्या शुभारंभ समारंभप्रसंगी दिली.

नवी मुंबई खारघर येथील ग्रामविकास भवनाच्या विकास कामाचा शुभारंभ ग्रामविकास व पर्यटन मंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते **दि.१९ ऑगस्ट २००९ रोजी** करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिडकोचे अध्यक्ष **श्री. नकुल पाटील,** व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल,** सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव,** संचालक **मा. श्री. नामदेव भगत** हे मान्यवर उपस्थित होते. त्याप्रसंगी श्री. मोहिते-पाटील बोलत होते.

श्री. मोहिते-पाटील पुढे म्हणाले की, '१९७२ साली जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना मुंबई शहराजवळ शासकिय कामांसाठी लोकप्रतिनीधी व शासकीय अधिकाऱ्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी ग्रामविकास भवन उभारण्याची मागणी केली होती. लोकप्रतिनिधींना अधिक सक्षम व प्रशिक्षित करण्यासाठी या ग्रामविकास भवनची निर्मिती करण्यात येत आहे. या भवनाच्या बांधकामाला लागणारा खर्च कमी पडणार नाही याची खात्री आहे, तेव्हा भवनाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे सांगत श्री. मोहिते-पाटील पुढे म्हणाले की, 'सिडकोच्या माध्यमातून या परिसरातील पर्यटनस्थळांचाही विकास करण्यात येत आहे ही अभिमानाची बाब आहे'.



सिडकोचे अध्यक्ष **श्री. नकुल पाटील** आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, 'आज प्रचंड वेगाने शहरीकरण होत आहे, पण गावांचा विकास झाला तरच महात्मा गांधीच्या विचारांना हातभार लागणार आहे. सिडकोच्या परिसरात ग्रामविकास भवनाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे महत्वाचे पाऊल श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या श्रेयातून पडत आहे.

















सिडकोला ग्राम विकास भवनाची भव्य-दिव्य वास्तू उभारण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून, वास्तू उभारणीच्या कार्यात येणाऱ्या अडीअडचणी दूर करून सर्वोतोपरी मदत केली जाईल,' असेही त्यांनी सांगितले.

सेक्टर-२१ खारघर येथील भूखंड क्र. ७६ (अ) मधील ४१३७.९३ चौ. मी. क्षेत्रात मुख्य इमारतीत ५०० व्यक्ती बसू शकतील एवढ्या क्षमतेचे सभागृह, १०० व्यक्तींच्या कार्यशाळेकरिता समिती कक्ष, दुहेरी पलंगाच्या ५७ खोल्या, १२० व्यक्तींसाठी स्वयंपाकगृहासह भोजनगृह, बचतगट आणि ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी ३३ दुकाने अशा सोयीयुक्त वास्तूत पंचायत राज संस्थांच्या सदस्यांकरिता प्रशिक्षण केंद्र, स्वयंसहाय्य बचत गटांसाठी कायमस्वरूपी विक्रीकेंद्र, पंचायत राज संस्थांच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांसाठी मुंबई येथे शासकीय कामासाठी येणाऱ्यांकरिता राहण्याची सोय, शासनाच्या कार्यशाळा व परिसंवादासाठी व्यासपीठ व ५० वाहनांसाठी स्टील्ट पार्किंगची व्यवस्था हे या प्रकल्पाचे उद्दिष्टे ठरणार आहे. या प्रकल्पासाठी **१८ कोटी ७ लाख रुपये** इतका खर्च अपेक्षित आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियोजित ग्रामविकास भवनाच्या प्रांगणात वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी ग्रामविकास विभागाचे उपसचिव **श्री. सुनिल चव्हाण,** विभागीय महसूल कार्यालयाचे उपायुक्त (विकास) **श्री. प्रकाश देवऋषी,** उपायुक्त (आस्थापना) **श्री. बाळासाहेब जगताप, श्री. एस. सी. देशपांडे, श्री. दिलीप शेकदार, श्री. एम. डी. लेले, श्री. किरण शिंदे, श्री. के. वाय. जोशी, श्री. ए. एस. पाटील, श्री. एस. एस. चौधरी,** सिडकोतील अभियंते, अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामविकास विभागाचे अधिकारी अभियंते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६२व्या स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहात साजरा

भारताच्या स्वातंत्र्याचा ६२वा वर्धापन दिन **दि. १५ ऑगस्ट २००९ रोजी** सिडकोच्या सीबीडी बेलापूर येथील कार्यालयाच्या प्रांगणात दिमाखदार सोहळ्याद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन साजरा करण्यात आला.

सिडकोचे अध्यक्ष मा. **श्री. नकुल पाटील** यांच्या हस्ते शासकीय इतमामात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी **श्री.जी.एस. गिल्ल,** उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व **श्री. दिलीप जाधव,** सहव्यवस्थापकीय संचालक या मान्यवरांसह सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सिडको सुरक्षा दल व सिडको अग्निशामक दलाच्या शिस्तबद्ध संचालनात राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

नवीन औरंगाबाद आणि वाळूज महानगर कार्यालयांतही स्वातंत्र्यदिनाचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन औरंगाबाद कार्यालयात **श्री. मनोहर भगत,** मुख्य प्रशासक (नवीन शहरे) यांच्या हस्ते तर, वाळूज महानगर कार्यालयात **श्री. के. टी. मगरे,** कार्यकारी अभियंता यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या समारंभातही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मोठ्या उपस्थितीत सिडको सुरक्षा दलातर्फे राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.











# CIDCO's participation in MEDC Seminar











CIDCO participated in the two-day seminar organized by the Maharashtra Economic Development Council (MEDC) on **'Golden Maharashtra: Infrastructure Summit'** on **4th & 5th August, 2009** at Hotel Taj Mahal, Mumbai. The Conference was called to principally discuss and debate Key Government Initiatives in (a) Projects under Pipeline and (b) Projects in Conceptual Stage, with a view to get feedback and inputs of experts and professionals from business and industry. Besides, Policies - Procedures - Projects - Business Opportunities in Infrastructure via 'Public-Private Partnership' were also discussed.

The Fourth Session of the Conference focused on 'Ports & Aviation - Growth Imperatives', where **Shri G. S. Gill,** IAS, Vice Chairman & MD - CIDCO, along with **Shri S. Sinha,** ACTE - CIDCO, made a presentation on CIDCO's Navi Mumbai International Airport (NMIA) and its prospects. The presentation shed light on the fact that Mumbai Metropolitan Region's present air travel demand is 25.86 MPPA, which would elevate to a staggering 91 MPPA by 2030-31. Whereas the existing Mumbai Airport would saturate by 2013 catering to only 40 MPPA. To absorb the balance air travel demand, a 2nd Airport is needed. Therefore, the Navi Mumbai International Airport is proposed by CIDCO.

Proposed to be made with a total project cost of Rs. 9970 crore, the Navi Mumbai International Airport would encompass an area of 1,140 Ha and will have two independent parallel runways with a domestic terminal area of 3 lakh sq. m. and international terminal area of 2 lakh

sq. m. The Airport will conform to Aerodrome Code 4-F (A-380) as well as the latest ICAO standards. It will be one of the few 'Greenfield' airports of the world.

The Airport would be accessible through the existing NH-4B, SH-54, Amra Marg and Khandeshwar Railway Station on the CST-Panvel Railway route, as well as the proposed MTHL, Amra Marg (4 Lane), Airport Station on Ring Railway / Metro and Hovercraft service to South Mumbai.

The Consultants involved in the project include LBG-RITES-INECO Consortium (Master Plan & DPR), CWPRS Pune (Training and diversion of Gadhi and Ulwe rivers), IIT Mumbai (EIA and Environment Consultant), Hemant Sahay Associates (Legal Consultant) and ICAO (Airport Project Document Reviewer).

MOCA, GoI has granted the 'in-principle' approval for NMIA, whereas State Cabinet, GoM has approved the development of the project.

The project also presents opportunities for private organizations to participate in the areas of geo-technical investigations and various field works, area leveling and land development works, development of various airport & allied facilities, development of plant & equipment for the airport, operation & maintenance of ground services, airport off-site infrastructure and development of airport supporting activities.







The Conference was also attended by **Mr. Aziz Khan,** IAS, Principal Secretary - Industries, GoM, **Dr. J. M. Phatak,** Municipal Commissioner - MCGM, **Mr. Ratnakar Gaikwad,** IAS, Addl. Chief Secretary, GoM & Metropolitan Commissioner - MMRDA, **Mr. Dilip Karmarker,** VP - IIDC, **Mr. T. Benjamin,** IAS, Secretary - UD (I), GoM, **Mr. Suhas Eklahare,** Senior VP - Nagarjun Construction, **Mr. Subrato Ratho,** IAS, Secretary - Energy, GoM, **Mr. Ramakrishnan G. K.,** Tata BP Solar, **Mr. Nashikkar,** Jt. MD - MSRDC, **Mr. G. M. Khandare,** IAS, Principal Secretary - PWD, GoM, **Mr. S. S. Hussain,** Chairman - JNPT, **Mr. G. S. Gill,** IAS, VC & MD - CIDCO, **Mr. Trivedi,** HAL, **Mr. Ashwani Kumar,** IAS, CEO - MMB, **Dr. K Shivaji,** IAS, CEO - MIDC and **Mr. Mukesh Malhotra,** President - MCCIA (Pune), **Mr. P. V. Satish,** Sr. Economist and **Mr. S. Vijaykumar,** Sr. Transportation Engineer. The Conference was called for the State Govt., media, professionals, bankers, overseas investors and trade commissioners, and State Govt. Departments such as Industries, PPL-CELL, GAD, Energy, PWD, UD, Water Supply, Transport, Housing, Health, Higher Education and Agencies - MSRDC, MMRDA, MCGM, MMB, MJP, MTDC, MHADA, MADC, MIDC and CIDCO.

MEDC has always believed that if there is an active participation and commitment from the Govt. of Maharashtra and the Private Sector in the State (especially in the area of infrastructure), then Maharashtra has the potential to become a globally competitive investment destination. The Conference aimed to review the present status of infrastructure in Maharashtra and discuss the policy initiatives needed to further improve the State's infrastructure across all the sectors.

# Impact of 12.5% Scheme on Socio-demographic & Economic Profile of PAPs under the Navi Mumbai Project

A census of the **'Impact of 12.5% Scheme on Socio Demographic & Economic Profile of PAPs under the Navi Mumbai Project'** was conducted by the Statistics Department of CIDCO in collaboration with the Tata Institute of Social Sciences (TISS) with the broad objective of understanding the impact of 12.5% Scheme on socio-demographic and economic profile of the PAPs. The study also aims to know the socio-economic status of PAPs, and the level of satisfaction with location of plot received under 12.5% Scheme and with physical infrastructure. Besides, the findings shed light on use of plot allotted under the scheme, to ascertain how the plot has been shared by legal heirs, utilization of amount received through sale of plot under this scheme and suggestions from PAPs for improvement in 12.5% Scheme.

**Shri. G. S. Gill,** Vice Chairman & Managing Director – CIDCO, mentions "CIDCO has also provided many other benefits to the PAPs, such as direct employment, assistance in finding employment, reservation in allotment of stalls, free vocational training, stipend in education and awarding of small civil work contracts to the registered societies of the PAPs. CIDCO also extends grant-in-aid to the villages located within the city of Navi Mumbai. This grant-in-aid can be used for improvement in school buildings, community halls and building of toilet blocks."

The findings of the present report are derived from the census of all the 900 households who had taken the possession of land 'allotted under 12.5% scheme' in 14 villages of the Panvel Taluka (Belpada, Kopra, Kamothe, Naupada, Juipada, Tembode, Valvali, Asudgaon, Kalundre, Kalamboli, Roadpali, Taloja, Padghe and Kharghar) in Navi Mumbai.




The study reveals that PAPs who have pucca houses with ground and two or more floors constitute the highest percentage in general (37%) followed by those who have pucca houses with ground and first floor (27%). The highest percentage of PAPs have built-up area in the range of 1,001-2,000 sq. ft. (35%) followed by 501-750 sq. ft. (23%) built-up area of house. Almost all of the PAPs (99%) have stated that they are the owners of their houses. Individual connection of water supply is reported by majority of the PAPs (61%) followed by nearly one- fourth of them (21%) who depend on wells for drinking water. While almost all the households of PAPs (99%) have electricity connection, most of them (79%) have individual / independent toilet facility.



Common well: One of the sources of drinking water

An overwhelming proportion of the PAPs (92.1%) belong to the Hindu religion, and a large number of the respondents (86.7%) belong to the 'Agri' community, which is categorized as the Other Backward Caste (OBCs). Almost all the PAPs (98%) speak Marathi as their mother tongue. A majority of the PAPs (78%) have been staying in their present location for the last 31-70 years.

The educational status of family members of the PAPs reveals that an overwhelming proportion of them (85.9%) are literates (excluding 0-6 age group). Gender-wise occupational status of the working population showed that those who stated their occupation as Broker/

Real Estate / Business are mostly men (21.80%) than those among females (3.60%). Similarly, the workforce involved in either skilled or unskilled work are largely the male members (15.2% and 25.3% respectively), when compared to those among the females (2.1% and 4.5% respectively). Most of the women being housewives, they are engaged in renting business for their livelihood.

A majority of the PAPs have full-time employment (89.8%) followed by a few working on a part-time basis (5.9%) and as casual labour (4.3%). The occupational status of the family members showed that a considerable




number of them (18.0%) are brokers or involved in the real estate followed by 12.4% of them involved as skilled workers in the nearby industries. The highest percentage of the PAPs (25%) have their workplaces in villages followed by other places in Navi Mumbai (21%) or nodes in Navi Mumbai (17%). Nearly half of them (49.4%) reach their workplace by walking. The average number of earners in the family is 1.76. Out of the total earners, males constitute 79% and females 21%.

All the PAPs (96.7%) have television sets in their household. Cooking gas connections are available for nearly all the households




(92.8%). In case of washing machines, it is still considered to be a luxury item in the villages. Significantly, a majority of them (71.6%) have a refrigerator in their household. Computer as a household item is yet to gain its importance in the study area.

Therefore, almost all the PAPs have no internet facility in their household. Nearly one third of the PAP households (31.3%) have landline telephone facility. Again significantly, 90.3% percent of the PAPs have mobile phones. A good majority of PAPs (70.7%) have two wheelers like, a motor cycle / scooter / moped in 2009 as against 21% in 2003. Nearly one-fifth of them (21.7%) have auto-rickshaws in 2009 as compared to 4.5% in 2003. By selling out the 12.5% plot, in addition to constructing a good house, a large proportion of the PAPs (42.3%) purchased vehicle closely followed by another 62% who spent on various household items.

The percentages in the monthly income bracket of Rs. 5,000 was reduced in 2009 (45.7%) as against 2003 (73.6%) where as the monthly income group between 5,001 to 10,000 has increased from 20% to 32% in 2009 and a similar trend is observed in the other income groups.

The data on the economic status of PAPs in the selected villages reveal that those from the villages of Belpada (average: Rs. 12,214) and Roadpali (average: Rs. 10,392) have higher levels of household incomes, while the lowest was Rs. 6361 in Valvali village. The average income per household is Rs. 8,071 per month. The data on the average monthly income of households of PAPs by their family size shows that the highest income of Rs. 12,819 is noticed among the PAPs whose family members are more than nine.

Only a very few (1.2 %) received employment benefits from CIDCO. As many PAPs are less educated, only 14.7% benefited by the stipend. Only a few PAPs have taken technical education for which the stipend is more. A negligible percentage (0.6%) of the members from PAP families have received computer training. Only 0.3 % of the PAPs have received



some kind of shop / stall / ottla allotted directly by CIDCO or through its recommendations. Most of the PAPs (97.8%) spent their share of compensation money without any savings.

However, as per CIDCO's record, nearly 7% PAPs got employment, 88% benefited by stipend, 3% received computer training and 2% got shops / stall under the Navi Mumbai Project. The PAPs are provided with benefits of alternative employment, contract jobs, allotment of shops, stalls, trade loan, Quarry Permission, free vocational training, and stipend for education and training programme. Under the village expansion schemes (Gaothan in the local language); (GES), where were aimed at accommodating the natural growth of village families, and making the PAPs reap the benefits of value addition to their lands, land was offered by way of developed plots around the village sites at a nominal cost. Under the "Gaothan Expansion Scheme", which was initiated in 1986, a plot of 100 sq. m. was being allotted for each PAP and during the period of about 4 years, a land of approximately 27 Ha, was allotted covering about 7 villages. A scheme of land, part of which was allotted to PAPs as a matter of rehabilitation and taken on as an independent scheme under a banner of 12.5% Scheme, is implemented since 1994. Under this scheme, 30% of the land is deducted towards the infrastructural facilities and provided with 8.7% of the land.

The 12.5% Scheme became fully functional in 1994. A majority of the PAPs have received 501-1,000 sq. m. (22.6%) and 1,001-2,000 sq. m (27.8%) developed plots followed by 18.8% of the PAPs who received up to 500 sq. m. plots. Sharing of plots between the family members and small size of acquired lands by CIDCO has resulted in each PAP receiving plots relatively small in size. Most of the title holders (91.7%) of the allotted plots are two or more in number.

Most of the PAPs (92.3%) are satisfied with sharing the entitlements of the allotted land. More than half of the PAPs (57.1%) have received plots adjacent to their present houses. The PAPs who expressed their dissatisfaction with the location of the allotted plot have stated reasons, such as distant location of the plot, not attractive from real estate angle, no scope of development, far away from the present house and the place of work. A majority of the PAPs (70%) have sold their plots to the builders, while 19% of the PAPs are yet to decide of its utilization.

Better housing (85.5%) and up gradation of standard of living (81.2%) are the main aspects over which PAPs have spent the amount, which they received through the sale of their plot.

The study also reveals the fact that a large majority of the PAPs have not developed the allotted land on their own. Economic constraints are the major reasons for nearly a quarter of them (22.9%) for not developing the allotted land on their own. Other reasons were: problems in acquiring plot from CIDCO, and the family disputes. Among the sampled PAPs, a few of them (11.9%) have retained all or a part of the land not developed.

Most of them have said that the benefits from the allotted or developed land have been shared fairly among the legal titleholders. Almost all of the PAPs (98.6%) have stated that there is no pressure whatsoever from the builders and real estate agencies for selling the plots.

Though the basic services in these villages are much better than elsewhere, majority of the respondents are either satisfied (53%) or dissatisfied (42.1%) with the approach roads leading to their villages. With regard to water supply to the house, majority of the PAPs are either satisfied (71%) or not satisfied (26%). Partial satisfaction with the electricity supply is mostly noticed due to long power cuts.



Type of house in study area

A majority of the PAPs are satisfied (90%) with the availability of educational institutions in their area. Almost all the PAPs have stated that they have adequate religious facilities in their area and majority (90%) of them are satisfied with such facilities. In terms of basic services, except the health, by and large, the villages under focus are well-served.

The survey was undertaken under the leadership of **Dr. P. M. Sandhya Rani** and **Prof. R. N. Sharma** of TISS and under the supervision of **Ms. Rita Abbi,** Sr. Statistician – CIDCO.

# वाशी रेल्वे स्थानकाचे वाणिज्यिक संकुल व्यवस्थापनाकरिता व्हीआरएससीसीएलकडे सुपूर्द



सिडकोची नियोजनातील दूरदृष्टी अधोरेखीत करणारे, भारताच्या रेल्वे वाहतुकीत आमूलाग्र परिवर्तनाचा दूत व रेल्वे स्थानकाच्या वाणिज्यिक नियोजनात मैलाचा दगड मानले जाणारे वाशी रेल्वे स्थानकाचे वाणिज्यिक संकुल देखभालीकरिता **दि. १५ ऑगस्ट २००९ रोजी** सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री.जी.एस.गिल्ल** यांच्या हस्ते व्हीआरएससीसीएलकडे सोपविण्यात आले.

याप्रसंगी सिडकोचे **डॉ. डी.एल.एन. मूर्ती, डॉ. मोहन निनावे, श्री. ए. एम. अग्रवाल, श्री. बी. बी. मेहता, श्री. रविकुमार, श्री. के. जे. संख्ये, श्री. दिपक चव्हाण, श्री. के. एल. ढाके, श्री. एस. डी. आपटे, श्री. आर. पी. शर्मा, श्री. पी. टी. पाटील, श्री. एफ ए. एच. खान, श्रीमती कोरिना कक्कर, श्री. मुरलीधरन** व **श्री. भरत** यांची उपस्थिती होती.

नवी मुंबईतील पहिले रेल्वे स्टेशन असणाऱ्या वाशी रेल्वेस्थानक वाणिज्यिक स्थानकात इन्फोटेक पार्कसह देशी-विदेशी कंपन्यांची अनेक कार्यालये आहेत. या रेल्वेस्थानकाचा विकास करताना त्यात दडलेल्या वाणिज्यिक विकासाच्या गुणवत्तेचा विचार करून सिडकोने आजवरच्या निव्वळ रेल्वे स्थानकाला वाणिज्यिक संकुलाच्या संकल्पनेची जोड दिली. नवी मुंबईच्या अत्याधुनिक विकासाचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या या स्थानकाची संपूर्ण देखभाल व नियोजन आतापर्यंत सिडको अतिशय चोखपणे सांभाळले. मात्र या अद्वितीय वाणिज्यिक संकुलाच्या व्यवस्थापनात अधिक सक्षमता येऊन त्याचे प्रवाही सूसुत्रीकरण व्हावे या उद्देशाने हे स्थानक संबंधित क्षेत्रात लौकीक मिळवून असणाऱ्या कंपनीकडे सोपविण्याचा निर्णय सिडको प्रशासनाने घेतला.

दि. १५ ऑगस्ट रोजी रेल्वे प्लॅटफॉर्म वगळता स्थानकाच्या देखभालीची व संबंधित नियोजनाची सर्व जबाबदारी व्हीआरएससीसीएलकडे सोपविण्यात आली. सदर कंपनीला वाशी रेल्वे स्थानक संकुलाची डागडुजी, स्वच्छता, व्यवस्थापन, सुरक्षा, हस्तांतरण आदींसह नवीन ध्येय-धोरणे निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सदर योजनेच्या कंपनी फॉर्मेशनकरिता सल्लागार म्हणून दीपक ब्रिज ॲण्ड असोसिएटस् यांची नियुक्ती करण्यात आली होती.

यावेळी कंपनी स्थापनेची कार्यवाही चोख पार पाडल्याबद्दल **श्री. दिपक गुप्ता** आणि **श्री. आर. पी. शर्मा** यांचा श्री. गिल्ल यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्रीमती कोरीना कक्कर** यांनी तर आभार प्रदर्शन **श्री. बी. बी. मेहता** यांनी केले.

यावेळी वाशी स्टेशनचे स्थानक संकुलातील मालमत्ता धारक बहुसंख्येने उपस्थित होते.











## CIDCO Planners visit Lavasa Hill City

A team of Planners from the Planning Department of CIDCO visited the hill city of Lavasa on **14th August, 2009** to understand the planning principles and on-site development aspects of a planned city amidst hills. The team included **Mr. D. V. Shekdar,** CAP, **Mr. M. D. Lele,** ACP (NM), **Mr. Kiran Shinde,** ACP (NT), **Mrs. Aparna V., Mr. Venu Gopal, Mr. Ravindra Mankar, Mrs. Manjula, Mrs. Pranjali, Mrs. Vaibhavi, Mr. Waghmare** and **Mrs. Madhura**.



Lavasa is located in between Mumbai and Pune in the midst of the majestic Sahyadris, nestled in an emerald green valley surrounded by verdant, rolling hills, clouds and seasonal waterfalls. The city is coming up on eight huge hillocks that surround the elongated Varasgaon Dam backwaters of about 60 km in length, to ensure excellent natural habitat for the city. Situated 2,000 to 3,000 feet above sea level, it is a self-contained world where people can live, work, learn and play in harmony with nature. It covers an area of 18 villages of Mulshi (15) and Velhe (3) Tehsils of Pune district. Lavasa Corporation has been declared the Special Planning Authority on 13th August, 2008 by the Urban Development Department of the Govt. of Maharashtra for an area of about 3,056 Ha, which is under acquisition of the promoters. Lavasa is India's first hill city being developed privately, where the principles of new urbanism have been used to create an efficient modern habitat.

The Planners visited the recreational, residential and commercial areas being developed to make the city a self-contained one. They undertook a nature trail, sailing experience in the lake and appreciated the efforts being made to encourage setting up of hospitality and educational sector activities in an environmentally sustainable manner.

The visit has helped the Planning team to understand some aspects of planning in a hilly terrain. Chikhaldara, Kharghar Hill Plateau and Science Park would be some of the projects of CIDCO in the near future where this experience will count considerably.



## सिडकोच्या निर्मल येथील कार्यालयात आणि सिडको सुरक्षा दलातर्फे सत्यनारायणाची महापूजा संपन्न

सालबादप्रमाणे सिडकोच्या निर्मल, नरिमन पॉइंट येथील कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वतीने **दि. १२ ऑगस्ट २००९** रोजी, तसेच सिडको सुरक्षा दलाच्या वतीने सिडकोच्या सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात **दि. ११ ऑगस्ट २००९ रोजी** सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री.जी.एस. गिल्ल** तसेच सिडकोच्या अनेक मान्यवरांची या सोहळ्यांना उपस्थिती लाभली. तसेच निर्मल आणि सिडको भवनातील सिडकोच्या समस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याप्रसंगी तीर्थप्रसादाचा लाभ घेतला.





## सिडको एम्प्लॉईज युनियनची द्वारसभा संपन्न

सिडको कर्मचारी संघटनेच्या वतीने **दि. १८ ऑगस्ट २००९ रोजी** द्वारसभेचे आयोजन करण्यात आले.

या द्वारसभेत सहाव्या वेतन आयोगानुसार मासिक वेतन, किरकोळ रजांचे रोखीकरण तसेच कॅशलेस मेडिकल कार्ड आदी विषयांवर सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल,** सरचिटणीस **श्री. मिलिंद बागुल** व अन्य पदाधिकाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

## सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन तर्फे 'कोळीबाणा'चे आयोजन

सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन तर्फे **दि. २० ऑगस्ट २००९** रोजी सिडको भवन येथील सातव्या मजल्यावरील सभागृहात एम्प्लॉईज युनियनच्या नवनियुक्त पदाधिकारी व सभासदांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष **श्री. रामचंद्र म्हात्रे** व यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात नवनियुक्त सिडको एम्प्लॉईज युनियनला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या. सिडको एम्प्लॉईज युनियनच्या नवनियुक्त पदाधिकारी व सभासदांच्या सत्काराप्रित्यर्थ सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारीफेअरच्या वतीने 'कोळी बाणा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मनोरंजनपर कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

## स्वाईन फ्ल्यू: नवी मुंबई सुरक्षित

मागील महिन्यात पूर्ण जगभर धुमाकूळ घालणारा स्वाईन फ्लू हा साथीचा रोग नवी मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम करू नये म्हणून सिडकोद्वारा मोहिम राबविण्यात आली. या संकटाशी सामना करण्यास जनता सज्ज व्हावी याकरिता सिडकोच्या आरोग्य विभागाने व्यापक जनजागृती मोहिम राबविली. भित्तीपत्रके, माहितीपत्रके आणि हस्तपत्रिकांच्या माध्यमातून स्वाईन फ्ल्यूची लक्षणे, तो टाळण्याकरिता घ्यावयाची दक्षता आणि लागण झाल्याची शक्यता लक्षात आल्यास घ्यावयाची उपाययोजना यांची माहिती जनतेस देण्यात आली. ही मोहिम मुख्य आरोग्य अधिकारी **डॉ. डी. एस. बावस्कर** यांच्या नेतृत्वाखाली पार पडली व अजूनही देशातून पूर्णपणे उच्चाटण न झालेला हा



आजाराच्या जनजागृतीकरिता सिडकोचे अधिकारी परिश्रम घेत आहेत. प्रतिकार हाच या रोगाचा परिणाकारक उपाय असून, सदर रोगाची लक्षणे आढळल्यास आणीबाणीच्या प्रसंगी नवी मुंबईतील इस्पितळांत उपचाराची व्यवस्था असल्याचे आवाहन सिडको आरोग्यविभागाद्वारे नवी मुंबईकरांना करण्यात आले.

## हार्दिक अभिनंदन

सिडको एम्प्लॉईज युनियनचे सह सचिव **श्री. हितेंद्र सदाशिव घरत** यानी आजपर्यंत केलेल्या सामाजिक सेवेबद्दल, ज्यात रक्तदान, शैक्षणिक सामाजिक, धार्मिक, कामगार, क्रीडा व दत्तक योजना यात नेहमी अग्रेसर राहून केलेल्या सेवेबद्दल त्याना गुरूकुल ॲकडमी उरण यांच्यातर्फे सन २००८चा ''रायगड जिल्हा कामगार रत्न पुरस्कार'' देण्यात आला.

सदर प्रसंगी **मा. सुनिलजी तटकरे,** (पालकमंत्री, रायगड जिल्हा) उर्जामंत्री महाराष्ट्र राज्य, **मा. संजीवजी नाईक साहेब,** खासदार ठाणे, **मा. नकुल पाटिल साहेब,** अध्यक्ष सिडको हे उपस्थित होते.



## पदोन्नती व नियुक्ती

सिडको महामंडळात ऑगस्ट २००९ मध्ये पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती देण्यात आली आहे.

### पदोन्नती

◆ **कार्यकारी अभियंता (स्थापत्य): श्री. ए. ए. त्यागी** ◆ **कार्यकारी अभियंता (दूरसंचार) श्री. वाय. एम. चव्हाण** ◆ **सहाय्यक कार्यकारी अभियंता: श्री. दिपक मडके** ◆ **कार्यालयीन सहाय्यक: श्री. पी. जी. मोरे व श्री. आर. जी. उरणकर** ◆ **उच्चश्रेणी लघुलेखक: श्रीमती व्ही. आर. पिल्ले, श्रीमती एस. बी. जोशी, श्री. के. के. सतपाल व श्री. एम. एस. डोळस** ◆ **उप सुरक्षा अधिकारी: श्री. के. एल. भगत** ◆ **सहाय्यक उद्यान अधिकारी: श्री. एस. बी. कर्वे.**

### नियुक्ती

◆ **सहाय्यक परिवहन अभियंता: श्री. एम. महादेव, श्री. के. जी. सदावर्ते, श्री. ए. जे. अग्रवाल, श्री. एस. एस. खुसनुरे व श्री. आर. एस. इंगोले** ◆ **सहाय्यक फोरमन: श्री. एम. एन. सावर्डेकर** ◆ **उप नियोजनकार: कुमारी एस. पी. पोहेकर** ◆ **संगणक चालक: कुमारी ए. ए. सोहोनी** ◆ **शिपाई: श्री. यु. जे. पाटील.**

पदोन्नती प्राप्त व सर्व नवनियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## श्रद्धांजली



सिडको महामंडळातील लिपिक या पदावर कार्यरत असणाऱ्या **श्रीमती शुभदा अनंत जोशी** यांचे सोमवार दि. ३ ऑगस्ट २००९ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.

तसेच सिडको महामंडळातील भूमी विभागात कार्यालयीन सहाय्यक या पदावर कार्यरत असणारे **श्री. नारायण एस. पाटील** यांचे बुधवार दि. २६ ऑगस्ट २००९ रोजी आकस्मिक निधन झाले.



त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी सिडको भवन प्रवेशद्वारा-जवळ शोकसभा आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

12

## निरोप समारंभ



श्री. एस. ए. परांजपे



श्री. एस. के. जयस्वाल



श्रीमती वसुधा अ. लेले

**श्री. एस. ए. परांजपे** (सहाय्यक लेखा अधिकारी), **श्री. एस. के. जयस्वाल** (तांत्रिक सहाय्यक), व **श्रीमती वसुधा अ. लेले** (टंकलिपिका) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ ऑगस्ट, २००९ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन, सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपादक, मुद्रक व प्रकाशक: डॉ. मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.